# रे.दि.मु.नं.११०/२०१२ मधील नि.७८ वरील आदेश

## (पांडुरंग विरुध्द प्रकाश)

**CNR MHSN-14000332-2012**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी नं.३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळाण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी नं.३ हे मयत असल्याचे बेलिफ रिपोर्टवरुन समजल्यानंतर वादी यांनी त्यांच्या वारसांचे बाबत अनेक ठिकाणी चौकशी केली. परंतु कोठेही त्यांचा शोध लागत नव्हता. तसेच मृत्युची तारिखही मिळत नव्हती. सदर माहिती वादी यांना मिळण्यास बराच कालावधी लागला. त्यामुळे वर नमुद कारणास्तव प्रतिवादी नं.३ हे मयत असल्याची खात्री वादींना झाल्यावरही प्रतिवादी नं.३ यांचा मृत्युचा उतारा व वारसांचे बद्दलीची माहिती या वादींना वेळेत उपलब्ध होऊ शकलेली नाही. त्यामुळे वादी यांना सदर प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी अर्ज देण्यास उशिर झालेला आहे. तरी वादीने झालेला उशिर माफ होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जावरच म्हणणे सादर करुन अर्ज बेकायदेशीर आहे. अर्जातील कथन चुकीचे असून कायदयाने विचारात घेता येणार नसल्याचे म्हटले आहे. तसेच प्रतिवादी नं.३ हे २०१४ साली मयत आहेत. तसेच दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी नं.३ यांनी हक्क निर्माण केल्याचे दिसत आहे. त्यामुळे वेळेत माहिती झाली नाही हे कारण न पटणारे आहे असे म्हटले आहे. अर्ज मंजूर करायचा झाल्यास योग्य ती कॉस्ट प्रतिवादींना देणेबाबत हुकूम होऊन अर्ज मंजूर करणेस हरकत नसल्याचे म्हटले आहे.

३. वादी अथवा प्रतिवादी मयत झालेस त्यांचे वारसांना ९० दिवसाचे आत दिवाणी प्रकिया संहिता आदेश २२ नियम ४ अन्वये एखादा प्रतिवादी मयत झाल्यास त्याच्या उत्तराधिकारी वारसांना रेकॉर्डवर घेण्याची तरतूद आहे. प्रतिवादी नं.३ हे २०१४ साली मयत झाले आहेत. वादींना वेळेत प्रतिवादी नं.३ याच्या मृत्यूची चौकशी व त्याची तारिख मिळत नसल्याचे कथन केले आहे. दावेचे स्वरुप पहाता प्रतिवादी नं.३ च्या वारसांनादेखील याकामी समाविष्ट करुन घेणे गरजेचे दिसते. परंतु, वादीने प्रस्तुतचा अर्ज उशिराने दाखल केला असलेने वादी हे खर्च देणेस पात्र आहेत. प्रस्तुतचा अर्ज योग्य त्या खर्चावर मंजूर करण्यास हरकत नाही असे म्हणणे दाखल केले आहे सबब, दोन्ही बाजूंच्या

वकिलांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर, अर्जातील व म्हणण्यातील कथनांचा विचार करता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं.३ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. वादीने या अर्जाचा खर्च म्हणून प्रतिवादीस र.रु.१००/- देणेचे आहेत.

सही/-

दिनांक १९/०६/२०१९ (एच. एस. सातपुते)

शिराळा सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा